**<u>सर्व संलग्न युनिटसाठी</u>** 15.12.2008

**<u>विषय : 9 वा व्दिपक्ष वेतन करार - बोलणी</u>**

बँक कर्मचारी सेना महासंघाने सादर केलेल्या ९ व्या व्दिपक्ष वेतन करारा अंतर्गत निवृत्ती वेतन व अनुकंपातत्वावर भरती या विषयांवर आज आय.बी.ए.व बँक कर्मचारी सेना महासंघ यांच्यात चौथी बैठक सायं.ठिक. 5.00 वाजता मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीत बँक कर्मचारी सेना महासंघातर्फे माझ्यासोबत श्री.नितीन कामत (खजिनदार) श्री.संतोष रावराणे (सहाय्यक सरचिटणीस ) यांनी प्रतिनिधीत्व केले.

आय.बी.ए.तर्फे श्री.एम.व्ही.नायर (चेअरमन वाटाघाटी समिती) श्री.ॲलन परेरा श्री.जगदीश पै श्री.सतिश गुप्ता व श्री.एम. वेणुगोपालन यांनी प्रतिनिधीत्व केले.

**अनुकंपातत्वावर भरती** : बँक कर्मचारी सेना महासंघाने या विषयावर आपली सविस्तर मते मांडली आणि मृत कर्मचायाच्या वारसाला उपजिविकेसाठी केवळ नोकरी आणि फक्त नोकरी हाच एक परिपुर्ण व योग्यच असा पर्याय होऊ शकतो. आर्थिक नुकसानभरपाई हा कायमचा पर्याय नव्हे असे निक्षून सांगितले. तरीही आर्थिक नुकसानभरपाई द्यायची झाल्यास संपुर्ण बँकीग क्षेत्रासाठी समान धोरण असावे व उच्चतम रकमेची मर्यादा जास्तीत जास्त वाढवावी. विद्यमान योजने मध्ये बयाच त्रुटी आहेत त्या दूर कराव्यात तसेच मृत कर्मचायाची देणी (liability) विचारात घेताना मृत कर्मचायाने बँकेच्या कर्मचारी सहकारी पतपेढीतुन घेतलेल्या कर्जाच्या शिल्लक रकमेची सुध्दा गणना करावी अशी आम्ही मागणी केली.

आय.बी.ए.ने उत्तर देताना असे सांगीतले की अनुकंपातत्वावर भरतीबाबत सर्वकष व परिपूर्ण अशी नविन योजना तयार केली आहे त्यावर तुमची मते व सुचना कळवाव्यात. त्यांनी असेही मान्य केले की(liability) च्या बाबतीत आम्ही केलेल्या सुचनांचा जरूर विचार करू.

**पेन्शनचा पर्याय** : आय.बी.ए.ला आम्ही प्रश्न केला की 1995 ते 2006 या काळात निवृत्त झालेल्या व पी.एफ.चा पर्याय स्विकारलेल्या (सुमारे 60000) कर्मचायांना जर पेन्शन द्यायची झाली तर त्यापोटी तरतूद करण्यासाठी लागणाया पेन्शन रक्कमेचा विचार करण्यात आला आहे का? त्याचप्रमाणे पी.एफ.चा पर्याय स्विकारलेल्या विद्यमान कर्मचायांना (सुमारे 265000) ॲक्च्युरीजच्या अहवालाप्रमाणे द्यावयास लागणाया सुमारे रू.6001 कोटी रक्कमेचा पुर्ण भार बँक व्यवस्थापनाने उचलावा.

यावर आय.बी.ए.ने उत्तर देताना निदर्शनास आणले की काही बँकांकडून त्यांच्या निवृत्त झालेल्या कर्मचायांचा ताळेबंद अद्याप प्राप्त झालेला नाही. तो प्राप्त झाल्यानंतर त्यांना द्यावयास लागणारी पेन्शनची रक्कम ॲक्च्युरीज व्दारे नक्की करणे सुलभ होईल. आणी त्यानंतरच प्रत्येक बँकेच्या नफाविभागणीवर त्याचा काय परिणाम होईल व त्याचा भार केव्हा आणि कसा उचलता येईल याचा विचार करता येऊ शकेल.

या सर्व गोष्टींसाठी आय.बी.ए.ने एक उपसमिती नेमून त्यामार्फत नियमित चर्चा घडवून आणावी या गोष्टीला आय.बी.ए.ने मान्यता दिली. यानंतर वाटाघाटी समितीचे अध्यक्ष श्री.एम.व्ही.नायर यांनी वेतन करार व पेन्शन योजना लवकरात लवकर संपन्न करण्यासाठी सर्वकष प्रयत्न करू अशी ग्वाही दिली व सदर बैठक संपुष्टात आली.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**

**बँक कर्मचारी सेना महासंघ झिंदाबाद !**
**भारतीय कामगार सेना महासंघ झिंदाबाद !**

( राजन तुळसकर )
सरचिटणीस